महाराष्ट्र शासन
आयुक्त
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष,
४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय रुग्णालय इमारत, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, फोर्ट, मुंबई -४०० ००१
दुरध्वनी - (०२२) - २२६२०३६३-६५ संकेतस्थळ - med-edu.in

आज़ादी का अमृत महोत्सव

File No.:DMER-१६०२३/२/२०२६-EST४

दि:- ~~स्वाक्षरीखाली नमूद~~ १३/०५/२०२६

प्रति,
अधिष्ठाता/ अधिक्षक / अधिक्षिका / सहयोगी प्राध्यापक / प्राचार्या,
शासकीय वैद्यकीय व दंत महाविद्यालये सलंग्नित रुग्णालये, आरोग्य पथके, परिचर्या महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य.

विषय - गट-क तांत्रिक, अतांत्रिक व परिचर्या संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय बदल्या करण्याकरीता प्रशासकीय बदलीस पात्र कर्मचाऱ्यांची अंतित यादी प्रसिध्द करुन बदली बाबतचे विकल्प सादर करण्याबाबत

संदर्भ - ०१) बदली अधिनियम - २००५
०२) शासन निर्णय क्र. एसआरव्ही २०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२, दि.०९ एप्रिल २०१८
०३) शासन निर्णय क्र. एसआरव्ही २०१७/प्र.क्र.४१५/कार्यासन १२, दि.२१ नोव्हेंबर २०२२
४) संचालनालयाचे समक्रमांकाचे तांत्रिक संवर्गाचे दि.१६/०३/२०२६ व दि.०६/०४/२०२६ रोजीचे परिपत्रक तसेच अतांत्रिक संवर्गाचे दि.२३/०३/२०२६ व परिचर्या विभागाचे दि.२०/०३/२०२६ रोजीचे परिपत्रक
५) संचालनालयाचे परिपत्रक क्र.DMER-१६०२३/२/२०२६-EST४, दि.०४/०५/२०२६ रोजीचे परिपत्रक

उपरोक्त विषयास अनुसरून संचालनालयाच्या संदर्भ क्र.५ च्या परिपत्रकान्वये संचालनालयाच्या अधिनस्त संस्थामध्ये कार्यरत गट-क तांत्रिक, अतांत्रिक व परिचर्या संवर्गातील प्रशासकीय बदलीस पात्र कर्मचा-यांच्या याद्या संचालनालयाच्या www.med-edu.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत. सदरील याद्या संबंधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून परिपत्रकात नमूद ६ मुद्यांच्या अनुषंगाने कार्यवाही करुन अचूक माहिती दि.०७/०५/२०२६ रोजी पर्यंत संबंधित कार्यासनाच्या ईमेलवर सादर करण्याबाबत निर्देशित करण्यात आलेले होते.

त्यानुसार संस्थांनी दि.१२/०५/२०२६ रोजी पर्यंत सादर केलेली माहिती अंतिम समजण्यात येवून बदलीस पात्र कर्मचा-यांची अंतिम यादी संचालनालयाच्या www.med-edu.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरील बदलीस पात्र कर्मचा-यांच्या याद्या संस्थांनी सादर

केलेल्या माहितीवरुनच तयार करुन अंतिम करण्यात आलेल्या आहेत, याची नोंद सर्व संस्थाप्रमुखांनी घ्यावी. दि.१२/०५/२०२६ रोजी नंतर आलेल्या माहितीचा विचार करण्यात आलेला नाही.

संस्थानी सादर केलेल्या माहितीमधील तसेच संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत असलेल्या यादीतील कर्मचा-यांची सर्वसाधारण बदली कोणत्या ठिकाणी करावी, याबाबत शासन निर्णय दि.०९/०४/२०१८ मधील विवरणपत्र क्र.१ नुसार कर्मचा-यांकडून विकल्प भरुन घेवून ते संस्थास्तरावर जतन करावेत. **विकल्प भरून घेतांना संस्थांची नावे नमूद न करता कार्यरत जिल्हा वगळून इतर जिल्हांची नावे नमूद करावीत.** कर्मचा-यांनी भरून दिलेले विकल्प खालील विवरणपत्रात हार्ड कॉपी तसेच Excel Sheet मध्ये सॉफ्ट कॉपी दि.१५/०५/२०२६ रोजी पर्यंत खालील प्रमाणे नमूद ई-मेलवर सादर करावी.

१. तांत्रिक संवर्गाची “फ” कार्यासनाच्या fbranchdmer@gmail.com या ईमेलवर

२. अतांत्रिक संवर्गाची “ड”कार्यासनाच्या dbranchdmer@gmail.com या ईमेलवर

३. परिचर्या संवर्गाची “ई” संवर्गाची ebranchdmer@gmail.com या ईमेलवर सादर करावी.

विवरणपत्र - (विकल्प)

संस्थेचे नाव :-

| अ.क्र | कर्मचा-याचे नाव | पदनाम | जिल्हाचे नाव (कार्यरत जिल्हाचे नाव वगळून इतर ५ जिल्हांची नावे नमूद करावीत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

आयुक्त
वैद्यकीय शिक्षण, संशोधन व आयुष